## विधि व न्याय विभाग

५ वा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जानेवारी २०२३.

### अधिसूचना

**हिंदू विवाह अधिनियम, १९५५.**

क्रमांक न्यायस्था-१२२१/६०१/प्र.क्र.१४९/कार्यासन-११.—हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३ च्या खंड (ब) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत, यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचना, जेथवर त्या सातारा जिल्ह्यातील वाई, खंडाळा व महाबळेश्वर या महसुली तालुक्यांशी संबंधित असतील तेथवर, त्यांमध्ये अंशतः फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक १४ जानेवारी, २०२३ पासून, महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) या अन्वये स्थापन केलेल्या दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वाई यांच्या न्यायालयाच्या सर्वसाधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये, उक्त अधिनियमान्वये कार्यवाही करावयाच्या प्रकरणांच्या बाबतीत, सातारा जिल्ह्यातील वाई येथे दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर यांना अधिकारीता असल्याचे विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**नि. वि. जिवने,**
शासनाचे विधि सल्लागार -नि-सहसचिव.

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

5th Floor, Main Building, Madam Cama Road,Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, dated 10th January 2023.

*NOTIFICATION*

Hindu Marriage Act, 1955.

No. Nyayastha-1221/601/C.R.149/ DESK-11.—In exercise of the powers conferred by clause (*b*) of section 3 of the Hindu Marriage Act, 1955 (25 of 1955), in its application to the State of Maharashtra, and of all other powers enabling it in this behalf and in partial modification of all the earlier notifications issued in that behalf, in so far as they relate to the revenue tehsils of Wai, Khandala and Mahabaleshwar in Satara District, the Government of Maharashtra hereby, with effect from 14th January,2023, specifies the Court of Civil Judge, Senior Division at Wai in Satara District as having jurisdiction in respect of the matters to be dealt with under the said Act, within the local limits of ordinary jurisdiction of the Court of Civil Judge, Senior Division, Wai, established under the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. V. JIWANE,
Legal Advisor-*cum*- Joint Secretary
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.